जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५०३ दिनांक - ०७/०७/२०२३**

**अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर**

## परराज्यातील इसमांकडुन ५,२०,००० /- रुपये किंमतीचे (२३० ग्रॅम आफिम ) हा अंमली पदार्थ, व इतर ऐवज जप्त

मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, यांनी पुणे शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्याकरीता कोंम्बींग ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान अंमली पदार्थ तस्करी करणारे गुन्हेगार यांची माहिती काढुन कडक कारवाई करण्याच्या सुचना व आदेश दिले आहेत.

वरिष्ठांनी दिलेले आदेश व सुचना नुसार अंमली पदार्थ विरोधी पथक १ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी सहा पोलीस निरीक्षक शैलजा जानकर व स्टाफ यांना त्याबाबत सुचना दिल्या होत्या.त्या नुसार दिनांक ०६/०७/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक १ कडील अधिकारी व स्टाफ बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार पांडुरंग पवार व सचिन माळवे,यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,पुणे सुखसागरनगर येथील सायरा पॅलेस गल्ली नंबर ७ कडे जाणारे सार्वजनिक रोडवर एक परराज्यातील इसम हा त्याचे ओळखीचे लोकांना आफिम हा अंमली पदार्थ विक्री करीत आहे.नमुद प्रमाणे मिळालेले बातमीचे अनुषंगाने कायदेशिर कारवाई करणे बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी अधिनस्त स्टाफ,अधिकारी यांना सुचना दिल्या.त्यानुसार इकडील विभागाकडील अधिकारी व स्टाफने सदर ठिकाणी सापळा रचुन इसम नामे लाडुराम वागाराम बिष्णोई, वय २० वर्षे रा.सध्या रा.काकडे वस्ती कोंढवा पुणे मुळ रा.मु पो सरनाऊ,तहसिल सांचोर, जि.जालोर राज्य राजस्थान यांस ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता,त्याचे ताब्यात कि.रु.एकुण किं.रु.५,२०,०००/- रु.चा,ऐवज त्यामध्ये २३० ग्रॅम आफिम हा अंमली पदार्थ किं.रु.४,६०,०००/- रु.चा,तसेच १०,०००/- रु.किं.चा एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल, ५०,०००/- रु.किं.ची एक होंडा ॲक्टीवा गाडी असा अंमली पदार्थ ऐवज अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्रीकरीता जवळ बाळगताना मिळुन आला म्हणुन त्यांचे विरुध्द बिबवेवाडी पो.स्टे.गु.र.नं.१३१/२०२३ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),१७(ब),प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.त्याबाबत पोलीस अंमलदार प्रविण उत्तेकर यांनी बिबवेवाडी पो.स्टे.येथे फिर्याद दिली आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे मा.सहा पो.आयुक्त,गुन्हे १,श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शना खाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विनायक गायकवाड, सहा पोलीस निरीक्षक,शैलजा जानकर, पोलीस अंमलदार मारुती पारधी,प्रविण उत्तेकर,विशाल दळवी, पांडुरंग पवार,संदिप शिर्के,राहुल जोशी,सचिन माळवे,सुजित वाडेकर,ज्ञानेश्वर घोरपडे,नितेश जाधव,रेहाना शेख,संदेश काकडे,योगेश मोहिते,यांनी केली आहे.